# MAHARASHTRA ACT No. XIX OF 1971

## THE MAHARASHTRA PUBLIC SECURITY MEASURES ACT, 1970

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २४ मार्च १९७१ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIX OF THE 1971

AN ACT TO MAKE SPECIAL PROVISION FOR THE SECURITY OF THE STATE, MAINTENANCE OF PUBLIC ORDER AND MAINTENANCE OF SUPPLIES AND SERVICES ESSENTIAL TO THE LIFE OF THE COMMUNITY IN THE STATE OF MAHARASHTRA.

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात, दिनांक ३१ मार्च १९७१ रोजी (प्रथम इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

## सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९

**राज्याची सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे व महाराष्ट्र राज्यातील समाजजीवनासाठी अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू ठेवणे यासाठी विशेष तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्याची सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था व महाराष्ट्र राज्यातील समाजजीवनासाठी अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू ठेवणे व उपरोक्त प्रयोजनाशी संबंधित असतील अशा इतर बाबींसाठी विशेष तरतूद करणे इष्ट आहे; **त्याअर्थी ;** भारतीय गणराज्याच्या एकविसाव्या वर्षी ; याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रवर्तन व कालावधी.

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्र सार्वजनिक सुरक्षा उपाय अधिनियम, १९७० असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) हे कलम ताबडतोब अंमलात येईल. शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस या अधिनियमाचे सर्व किंवा कोणतेही उर्वरित उपबंध, संपूर्ण राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात अंमलात येतील असा निदेश राज्य शासनास त्या अधिसूचनेद्वारे देता येईल; व तत्सम अधिसूचनेद्वारे निदेश देता येईल की ते (उपबंध) त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा तारखेस अंमलात असण्याचे बंद होईल.

१२३

(४) हा अधिनियम ३१ डिसेंबर १९७२ हा दिवस धरून त्या दिवसापर्यन्त अंमलात राहील.

(५) या अधिनियमाच्या समाप्तीनंतर किंवा हा अधिनियम अथवा कोणताही भाग अंमलात असणे बंद झाल्यावर मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे जणू; हा अधिनियम किंवा त्याचा कोणताही भाग एखाद्या महाराष्ट्र अधिनियमाद्वारे त्यावेळी निरसित केला असल्याप्रमाणे लागू होईल.

व्याख्या. २. संदर्भावरून अन्यथा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात—

(१) "अत्यावश्यक वस्तू" म्हणजे अन्न, पाणी, इंधन, प्रकाश किंवा वीज आणि त्यात राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे समाजजीवनासाठी अत्यावश्यक म्हणून जी इतर वस्तू किंवा जिन्नस जाहीर केली असेल त्यांचाही समावेश होईल.

(२) "घातपाती कृत्य" म्हणजे—

(अ) (एक) जातीय एकोपा, किंवा

(दोन) राज्याची किंवा त्याच्या कोणत्याही भागाची सुरक्षितता किंवा स्थैर्य—

धोक्यात आणणे;

(ब) (एक) शस्त्रास्त्राबाबत अधिनियम, १९५९ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेली शस्त्रास्त्रे किंवा दारुगोळा;

(दोन) स्फोटक पदार्थाबाबत अधिनियम, १९०८ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले स्फोटक पदार्थ, किंवा

(तीन) क्षारक पदार्थ;

यांचे अवैध संपादन, ताबा किंवा वापर या गोष्टी आयोजित करणे, त्यांचे पुरःसरण करणे किंवा त्यास मदत करणे.

(क) कोणतेही पोलीस दल किंवा अग्निशामक दल किंवा लोकसेवक म्हणून नोंद केलेल्या, नाव नोंदलेल्या, कामावर लावलेल्या व्यक्तींची कोणतीही इतर संस्था यातील सेवेसाठी सेवा-प्रवेशास किंवा त्या सेवेतील त्यांच्या उपस्थितीस बाध आणणे किंवा त्यांच्या निष्ठेला तडा पोहोचविणे;

(ड) कोणत्याही अत्यावश्यक वस्तूचे उत्पादन, प्रापण, पुरवठा व वितरण यासाठी आवश्यक असलेले (एक) कोणतेही काम किंवा क्रिया यास, अथवा (दोन) कोणतेही वाहतुकीचे किंवा स्थलांतराचे साधन यास,

औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या औद्योगिक विवादाच्या पुरःसरणार्थ असेल त्या व्यतिरिक्त,—

—व्यत्यय आणणे, विलंब करणे किंवा त्यावर निर्बंध घालणे.

असा ज्या कृत्याचा उद्देश असेल किंवा असे ज्या कृत्यामुळे संभवनीय असेल असे कोणतेही कृत्य.

**स्पष्टीकरण.**—(एक) शासनाचे धोरण किंवा उपाययोजना यात वैध व शांततामय मार्गांनी बदल घडवून आणण्याच्या हेतूने त्यांच्यासंबंधी नापसंती व्यक्त करणारी सद्भावमूलक कृत्ये ही, राज्याच्या सुरक्षिततेत किंवा स्थैर्यास धोका आणण्याच्या उद्देशाने केलेली किंवा तसे ज्यांच्यामुळे संभवनीय आहे अशी कृत्ये मानली जाणार नाहीत.

(दोन) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यातील कलम २४ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेला अवैध संप किंवा अवैध टाळेबंदी, उपखंड (ड) च्या प्रयोजनासाठी एखाद्या औद्योगिक विवादाच्या पुरःसरणार्थ केलेले कृत्य आहे असे मानण्यास येणार नाही.

(तीन) अत्यावश्यक वस्तूचे अवैध संपादन, तिचा अवैध साठा किंवा ने-आण हे उपखंड (ड) च्या प्रयोजनार्थ अशा वस्तूचे उत्पादन, प्रापण, पुरवठा व वितरण यासाठी आवश्यक असलेल्या क्रियेस व्यत्यय आणणे, विलंब करणे व त्यावर निर्बंध घालणे या उद्देशाने केलेले किंवा तसे ज्यामुळे संभवनीय आहे असे कृत्य मानले जाईल.

एक. हालचालींवर निबंध, वगैरे

व्यक्तींच्या हालचालींवर व कृत्यांवर निबंध घालणारे आदेश काढण्याची शक्ती.

३. (१) राज्याची सुरक्षा किंवा सार्वजनिक सुव्यवस्था राखणे अथवा राज्यातील किंवा त्याच्या कोणत्याही भागातील समाजजीवनासाठी अत्यावश्यक अशा वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू ठेवणे यास बाधा पोहोचेल अशा रीतीने वागण्यास कोणत्याही व्यक्तीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने किंवा ती कोणतेही घातपाती कृत्य करीत असून किंवा करण्याच्या बेतात असून किंवा करण्याची शक्यता असून तसे कृत्य करण्यास तिला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने जर तिच्यासंबंधी तसे करणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री पटली असेल तर त्यास—

(अ) आदेशाच्या उपबंधांद्वारे किंवा त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल असा प्राधिकारी किंवा व्यक्ती यानी जोवर तिला परवानगी दिली असेल त्याव्यतिरिक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रात किंवा ठिकाणी तिने असता कामा नये असा निदेश देणारा ;

(ब) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा ठिकाणी किंवा अशा क्षेत्रात निवास करण्यास किंवा असण्यास आणि ती तेथे त्यापूर्वीच जर नसेल तर आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत त्या ठिकाणी किंवा क्षेत्राकडे निघण्यास तिला फर्माविणारा ;

(क) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रीतीने, अशा वेळी व अशा प्राधिकाऱ्यास किंवा व्यक्तीकडे तिच्या हालचाली कळविण्यास किंवा जातीने हजर होण्यास किंवा या दोन्ही गोष्टी करण्यास तिला फर्माविणारा ;

(ड) तिची नोकरी किंवा धंदा किंवा इतर व्यक्तींशी चालणारे तिचे व्यवहार यासंबंधी आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येतील असे निबंध तिच्यावर लादणारा ;

(इ) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल/येतील अशी कोणतीही वस्तु/अशा कोणत्याही वस्तू तिने बाळगण्यास किंवा त्यांचा वापर करण्यास प्रतिबंध करणारा किंवा त्यावर निबंध घालणारा ;

आदेश काढता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशाद्वारे, ज्या व्यक्तीच्या संबंधात तो काढण्यात आला असेल त्या व्यक्तीला, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या निबंधांचे किंवा शर्तींचे यथोचित अनुपालन करण्याकरिता, जामीनदारांसह किंवा जामीनदाराशिवाय बंधपत्र करून देण्यास फर्माविता येईल.

(३) प्रतिबंधक स्थानबद्धता अधिनियम, १९५० अन्वये काढलेल्या आदेशान्वये जेव्हा कोणत्याही व्यक्तीस स्थानबद्ध करण्यात येईल तेव्हा, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, अशा आदेशाऐवजी उक्त पोट-कलमाच्या खंड (अ), (ब), (क) किंवा (ड) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे आदेश काढता येईल.

(४) या कलमाच्या उपबंधान्वये काढलेल्या आदेशाचे उल्लंघन करून जर कोणतीही व्यक्ती कोणत्याही क्षेत्रात किंवा ठिकाणी आढळून आली असेल किंवा अशा आदेशाच्या आवश्यकतांनुसार कोणतेही क्षेत्र किंवा ठिकाण सोडून जाण्यात कसूर करील तर, पोट-कलम (५) च्या उपबंधांना हानी न पोहोचता, तिला अशा क्षेत्रामधून किंवा ठिकाणामधून कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून दूर करण्यात येईल.

(५) जर कोणतीही व्यक्ती या कलमान्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील तर, दोषसिद्धीनंतर, तिला एक वर्ष मुदतीच्या मर्यादेपर्यंत कारावासाची किंवा दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील, आणि जर अशा व्यक्तीने पोट-कलम (२) च्या उपबंधांच्या अनुसार बंधपत्र करून दिले असेल तर तिचे बंधपत्र जप्त करण्यात येईल, आणि त्याद्वारे बद्ध असलेल्या कोणत्याही व्यक्तीने त्याबद्दल शास्ति दिली पाहिजे किंवा अशी शास्ति का भरण्यात येऊ नये याविषयी न्यायालयाचे समाधान होईल असे कारण दाखविले पाहिजे.

## दोन. विक्रेय वस्तूंचे नियंत्रण

विक्रेय वस्तूंच्या ने-आणीवरील नियंत्रण.

४. (१) राज्याची सुरक्षा, सार्वजनिक सुव्यवस्था राखणे किंवा राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात समाजजीवनास अत्यावश्यक असलेल्या वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू ठेवणे यांच्या प्रयोजनार्थ राज्यातून किंवा त्याच्या भागातून एखादी वस्तू हलविण्यावर निर्बन्ध घालणे आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर राज्य शासनास, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, कोणतीही व्यक्ती अशा विक्रेय वस्तू, जिनसा किंवा गोष्टी राज्यातून किंवा त्याच्या भागातून, ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली असेल त्या भागात पोलीस आयुक्तांच्या आणि इतरत्र जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या लेखी परवानगीखेरीज हलविणार नाही.

(२) पोट-कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्ती, आवश्यक वस्तू अधिनियम, १९५५ याचे कलम २, खंड (अ) मध्ये, व्याख्या केल्याप्रमाणे आवश्यक वस्तू असलेल्या कोणत्याही वस्तूच्या आंतरराज्य वाहतुकीस लागू होणार नाहीत आणि अशा कोणत्याही वस्तूच्या संबंधात केंद्र सरकारकडून त्या बाबतीत काढण्यात येईल अशा कोणत्याही आदेशास त्या बाधक होणार नाहीत.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे कोणत्याही एका वेळी तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा मुदतींकरिता अंमलात राहील.

(४) जर कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील तर दोषसिद्धीनंतर तिला एक वर्ष मुदतीच्या मर्यादेपर्यन्त कैदेची किंवा दंडाची किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

## तीन. विवक्षित जागा व क्षेत्रे यांत प्रवेश

संरक्षित जागा.

५. (१) जर कोणतीही जागा किंवा जागांचा वर्ग यांच्याबाबतीत, सार्वजनिक हितासाठी किंवा अशा जागेच्या किंवा जागांच्या वर्गाच्या सुरक्षिततेच्या व सुरक्षेच्या दृष्टीने—अनधिकृत व्यक्तींच्या प्रवेशावर निर्बन्ध घालण्यासाठी खबरदारीचे उपाययोजने इष्ट आहे असे राज्य शासनास वाटले तर, राज्य शासनास, आदेशाद्वारे ती जागा किंवा यथास्थिति त्या वर्गातील प्रत्येक जागा संरक्षित जागा असल्याचे घोषित करता येईल; आणि त्यानंतर तो आदेश जोवर अमलात असेल तोवर अशी जागा किंवा यथास्थिति अशा वर्गातील प्रत्येक जागा या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ संरक्षित जागा असेल.

(२) कोणत्याही व्यक्तीस राज्य शासनाची किंवा याबाबतीत राज्य शासनाने संरक्षित जागेच्या संबंधात यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या अधिकारावरील व्यक्तीची किंवा पोलीस आयुक्तांची किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याची किंवा अधिकारिता असलेल्या उप-विभागीय दंडाधिकाऱ्याची परवानगी घेतल्याखेरीज कोणत्याही संरक्षत जागेत प्रवेश करता येणार नाही किंवा त्या जागेवर किंवा जागेत राहता येणार नाही किंवा त्यावरून जाता येणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीस अशा कोणत्याही जागेच्या आसपास रेंगाळता येणार नाही.

(३) पोट-कलम (२) च्या अनुसार कोणत्याही व्यक्तीस संरक्षित जागेत प्रवेश करण्यास, किंवा त्या जागेवर किंवा जागेत असण्यास किंवा त्यावरून जाण्यास परवानगी देण्यात आली तर, अशा परवानगीनुसार वागताना ती, ज्या प्राधिकरणाने परवानगी दिली असेल त्या प्राधिकरणाकडून तिच्या वर्तणुकीचे नियमन करण्यासाठी जे आदेश देण्यात येतील त्या आदेशाचे पालन करील.

(४) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, संरक्षत जागेत प्रवेश करणाऱ्या किंवा प्रवेश मागणाऱ्या किंवा त्या जागेत किंवा जागेवर असलेल्या किंवा ती जागा सोडून जाणाऱ्या व्यक्तीची आणि अशा व्यक्तीने त्या जागेत आणलेल्या कोणत्याही वाहनाची, जलयानाची, प्राण्यांची किंवा वस्तूची झडती घेता येईल व झडतीच्या प्रयोजनार्थ अशी व्यक्ती, वाहन, जलयान, प्राणी किंवा वस्तू अटकावून ठेवता येईल :

परंतु, या पोट-कलमानुसार कोणत्याही स्त्रीची, स्त्रीखेरीज इतरांकडून झडती घेतली जाणार नाही.

(५) कोणतीही व्यक्ती, या कलमाच्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील तर तिच्याविरूद्ध जी कोणतीही कार्यवाही केली जाऊ शकेल तिला बाध न येता, तिला कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून तेथून दूर करता येईल.

(६) जर कोणतीही व्यक्ती, या कलमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील, तर तिला दोषसिद्धीनंतर तीन वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यन्त कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा करण्यात येईल किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

६. (१) लोकहिताच्या दृष्टीने किंवा कोणत्याही क्षेत्राच्या सुरक्षिततेच्या किंवा सुरक्षेच्या दृष्टीने, त्या क्षेत्रातील व्यक्तींच्या प्रवेशाचे नियमन करणे राज्य शासनास आवश्यक किंवा इष्ट वाटत असेल तर राज्य शासनास या अधिनियमातील इतर कोणत्याही उपबंधांस बाध न येता ते क्षेत्र संरक्षित क्षेत्र असल्याचे आदेशाद्वारे जाहीर करता येईल; आणि त्यानंतर जोपर्यंत तो आदेश अंमलात असेल, तोपर्यन्त असे क्षेत्र या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता संरक्षित क्षेत्र राहील. संरक्षित क्षेत्रे.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी आणि अशा दिवसानंतर व त्या आदेशाद्वारे ज्या माफीसंबंधी तरतूद केली जाईल अशा कोणत्याही माफीच्या अधीन, उक्त आदेशाद्वारे, संरक्षित क्षेत्र असल्याचे जाहीर केलेल्या क्षेत्रामध्ये उक्त तारखेच्या लगतपूर्वी जी व्यक्ती रहिवाशी नसेल अशी कोणतीही व्यक्ती, उक्त आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने तिला दिलेल्या लेखी परवान्याच्या अटींनुसार असेल त्याव्यतिरिक्त त्या क्षेत्रात राहणार नाही.

(३) कोणताही पोलीस अधिकारी किंवा राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केलेली कोणतीही इतर व्यक्ती यास संरक्षित क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या किंवा प्रवेश मागणाऱ्या किंवा संरक्षित क्षेत्रावर किंवा क्षेत्रात असलेल्या किंवा संरक्षित क्षेत्र सोडून जाणाऱ्या व्यक्तीची आणि अशा व्यक्तीने त्या क्षेत्रात आणलेल्या कोणत्याही वाहनाची, जलयानाची, प्राण्याची किंवा वस्तूची झडती घेता येईल व झडतीच्या प्रयोजनाकरिता अशी व्यक्ती, वाहन, जलयान, प्राणी किंवा वस्तू अटकावून ठेवता येईल :

परंतु, या पोट-कलमानुसार कोणत्याही स्त्रीची स्त्रीखेरीज इतरांकडून झडती घेतली जाणार नाही.

(४) या कलमाच्या उपबंधाचे उल्लंघन करून कोणतीही व्यक्ती संरक्षित क्षेत्रात असेल तर, तिच्याविरुद्ध जी इतर कोणतीही कार्यवाही केली जाऊ शकेल त्या कार्यवाहीस बाध न येता, तिला संरक्षित क्षेत्रात कामावर असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याच्या निदेशाद्वारे किंवा तदन्वये किंवा राज्य शासनाने याबाबत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीकडून तेथून दूर करता येईल.

(५) या कलमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करून जर कोणतीही व्यक्ती संरक्षित क्षेत्रात असेल तर तिला दोषसिद्धीनंतर तीन वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यन्त कारावासाची किंवा दंडाची शिक्षा करण्यात येईल किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

७. कोणतेही संरक्षित ठिकाण किंवा संरक्षित क्षेत्र यात— रक्षकावर बळजबरी करणे किंवा त्याला चुकविणे.

(अ) असे ठिकाण किंवा क्षेत्र याचे संरक्षण करण्याकरिता किंवा तेथे जाण्यास प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्याचे नियंत्रण करण्यासाठी नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीवर गुन्हेगारी बल-प्रयोग करून किंवा करण्याची धमकी देऊन, किंवा

(ब) अशा व्यक्तीला तिचा प्रवेश किंवा प्रवेशाचा प्रयत्न दिसणार नाही अशी खबरदारी घेऊन,

जी व्यक्ती प्रवेश घडवून आणील किंवा आणण्याचा प्रयत्न करील, अशा कोणत्याही व्यक्तीला दोषसिद्धीनंतर पाच वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यन्त कारावासाची किंवा दंडाची शिक्षा देण्यात येईल किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

## चार. घातपाती कृत्यांना प्रतिबंध

विघातक कृत्य.

८. (१) कोणत्याही गोष्टीची कार्यक्षमता बिघडवून किंवा तिच्या कामात व्यत्यय आणून किंवा अन्य कोणत्याही रीतीने पुढील गोष्टींवर हानिकारक रीतीने प्रतिकूल परिणाम करण्याच्या किंवा त्यांना नुकसान पोहोचविण्याच्या इराद्याने कोणत्याही व्यक्तीने कोणतेही कृत्य करता कामा नये---

(अ) शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या प्रयोजनाकरिता उपयोगात असलेली किंवा उपयोगात आणण्याचा इरादा असलेली कोणतीही इमारत, वाहन, यंत्रसामग्री, उपकरणसंच किंवा इतर मालमत्ता.

(ब) (भारतीय रेल्वे अधिनियम, १८९० यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेली) कोणतीही रेल्वे, हवाई रज्जुमार्ग, ट्राममार्ग, रस्ता, कालवा, कालव्याचे बंधारे, संरक्षण बांध, जलद्वारे (लॉक-गेटस्), पुल, अधःप्रणाल, सेतुमार्ग (Cause-way), बंदर, डॉकयार्ड, दीपगृह (भारतीय वायुयान अधिनियम, १९३८ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले), विमानतळ, विमानक्षेत्र धावपट्टा (Airstrip) किंवा त्यावरील कोणतीही संचमांडणी आणि (भारतीय तारायंत्र अधिनियम, १८८५ यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेला) कोणताही तारमार्ग किंवा खांब;

(क) रेल्वेचे किंवा ट्रामवेचे कोणतेही चक्रियान (Rolling Stock) किंवा कोणतेही जहाज किंवा वायुयान ;

(ड) कोणत्याही अत्यावश्यक विक्रेय वस्तूचे उत्पादन, वितरण किंवा पुरवठा यांच्या संबंधात वापरण्यात असलेली कोणतीही इमारत किंवा इतर मालमत्ता किंवा सांडपाण्याचे कोणतेही बांधकाम, खाण किंवा कारखाना ;

(ई) सरकारी गुप्त गोष्टींबाबत अधिनियम, १९२३ याच्या कलम २, पोट-कलम (८) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेले कोणतेही मनाई केलेले ठिकाण.

(२) पोट-कलम (१) चे उपबंध हे, ते ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीने एखादे कृत्य करण्या-संबंधी लागू होतात त्याचप्रमाणे ते, कोणताही विधी किंवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश याद्वारे अशा व्यक्तीवर लादलेल्या एखाद्या कर्तव्यानुसार जी कोणतीही गोष्ट तिला करावी लागत असेल ती कोणतीही गोष्ट करण्यात तिच्याकडून झालेल्या कोणत्याही वर्जनासंबंधी लागू होतील.

(३) जर कोणतीही व्यक्ती, पूर्ववर्ती पोट-कलमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील तर तिला सात वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यंत कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा करण्यात येईल किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

(४) एखाद्या मालमत्तेच्या बाबतीत या कलमाखालील अपराध करण्यात आलेला आहे असे माहीत असताना किंवा तसे सकारण वाटत असताना जो कोणी तशी कोणतीही मालमत्ता स्वीकारील किंवा ठेऊन घेईल त्यास, दोषसिद्धीनंतर, दहा वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यंत कारावासाची शिक्षा होईल व तो दंडाच्या शिक्षेसही पात्र होईल.

घातपाती कृत्यांबद्दल शास्ती.

९. जर कोणतीही व्यक्ती कोणतेही घातपाती कृत्य करील तर तिला दोषसिद्धीनंतर पाच वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यंत कारावासाची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा करण्यात येईल किंवा दोन्ही शिक्षा करण्यात येतील.

## पाच. सार्वजनिक सुरक्षितता व सुव्यवस्था

कोणताही स्फोटक पदार्थ नेण्या-आणण्याबद्दल किंवा ताब्यात असल्याबद्दल शिक्षा.

१०. कोणतीही व्यक्ती, कोणताही स्फोटक पदार्थ विधिसंमत उद्देशास्तव आपल्या अंगावर वाहून नेत नसून किंवा तो तिच्या ताब्यात किंवा तिच्या नियंत्रणाखाली विधिसंमत उद्देशास्तव ठेवलेला नाही, असा सयुक्तिक संशय ज्या परिस्थितीत निर्माण होईल अशा परिस्थितीत ती व्यक्ती आपल्या अंगावर कोणताही स्फोटक पदार्थ वाहून नेत असेल किंवा जाणूनबुजून तो जवळ बाळगीत असेल किंवा आपल्या नियंत्रणाखाली ठेवीत असेल, तर अशा कोणत्याही व्यक्तीला तो पदार्थ विधि-संमत उद्दिष्टासाठी तिच्या अंगावर वाहून नेत आहे किंवा जवळ बाळगीत आहे किंवा तिच्या नियंत्रणाखाली ठेवीत आहे असे दाखवून देणे तिला शक्य नसल्यास दोषसिद्धीनंतर सात वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यंत कारावासाची शिक्षा दिली जाईल; या शिक्षेत दंडाच्या शिक्षेचीही भर घालता येईल.

११. (अ) दंग्यात किंवा दंग्याच्या ठिकाणी अथवा त्याच्या आसपास घडलेल्या कोणत्याही सार्वजनिक शांतताभंगाच्या वेळी किंवा ज्या ठिकाणी असा सार्वजनिक शांततेचा भंग होईल त्या ठिकाणी, किंवा लूट करणे याची व्याख्या.

(ब) ज्या कोणत्याही क्षेत्रात दंगा किंवा सार्वजनिक शांततेचा भंग झाला असेल अशा क्षेत्रात व अशा क्षेत्रांमध्ये कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे पुन: प्रस्थापित होण्यापूर्वी, किंवा

(क) ज्या व्यक्तीची मालमत्ता चोरीस गेली असेल किंवा दंडनीयरीत्या तिचा दुर्विनियोग केला गेला असेल ती व्यक्ती दंग्याच्या किंवा सार्वजनिक शांततेच्या इतर कोणत्याही भंगाचा परिणाम म्हणून उपस्थित नसेल किंवा अशा मालमत्तेचे संरक्षण करण्यास समर्थ नसेल अशा परिस्थितीत,

दरवडा, लुटमारीचा, चोरीचा किंवा एखाद्या इमारतीत, जहाजावर किंवा वाहनात चोरीचा किंवा दंडनीय दुर्विनियोगाचा अपराध घडला असेल तर, जो कोणी असा अपराध करील त्याने लूट करण्याचा अपराध केला असल्याचे म्हटले जाईल.

१२. कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास त्याच्या दृष्टीपथात घडणारा लूटीचा अपराध थांबविण्यासाठी आवश्यक असेल असा, बलाचा वापर ठार करण्याच्या मर्यादेपर्यंत सुद्धा करता येईल. लूट थांबविण्यासाठी बलाचा वापर.

१३. (१) सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी किंवा सार्वजनिक सुरक्षेच्या कारणांसाठी किंवा चोरट्या आयातीस प्रतिबंध करण्यासाठी ज्या क्षेत्राकरिता पोलीस आयुक्ताची नियुक्ती करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात पोलीस आयुक्तास व इतरत्र जिल्हा दंडाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या नियंत्रणाच्या अधीन, आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही माफीच्या अधीन, त्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्रात किंवा क्षेत्रांमध्ये हजर असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वेळांच्या दरम्यान, विनिर्दिष्ट प्राधिकाऱ्याने किंवा व्यक्तीने दिलेल्या लेखी परवानगीच्या प्राधिकारान्वये असेल त्या व्यतिरिक्त, घरांच्या बाहेर असता कामा नये. संचार बंदी.

(२) कोणीही व्यक्ती या कलमान्वये केलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील तर, त्या व्यक्तीस दोषसिद्धीनंतर एक वर्ष मुदतीच्या मर्यादेपर्यंत कैदेची किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

## सहा. संकीर्ण उपबंध

१४. (१) या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही विशेष उपबंधास हानी न पोचवता, राज्य शासनास आदेशाद्वारे कोणत्याही व्यक्तीला, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी तिच्या ताब्यात असलेली कोणतीही माहिती किंवा वस्तू, जी राज्य शासनास घातपाती कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यांचे दमन करण्यासाठी मिळविणे किंवा तपासणे आवश्यक किंवा इष्ट वाटत असेल अशी माहिती किंवा वस्तू असेल, कोणत्याही विनिर्दिष्ट प्राधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस पुरविण्यासाठी किंवा हजर करण्यासाठी फर्माविता येईल : माहिती मिळविण्याची शक्ती.

परंतु—

(एक) एखाद्या वर्तमानपत्राचा संपादक, मुद्रक किंवा प्रकाशक यास, अशा वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या कोणत्याही मजकुरासंबंधात अशी कोणतीही माहिती किंवा वस्तू पुरविण्यास किंवा हजर करण्यास फर्माविता येणार नाही, आणि

(दोन) भारताचा पुराव्याबाबत अधिनियम, १८७२ याच्या उपबंधान्वये कोणत्याही व्यक्तीस जी कोणतीही माहिती किंवा वस्तू पुरविण्यास किंवा हजर करण्यास भाग पाडता येत नाही अशी माहिती किंवा वस्तू पुरविण्यास किंवा हजर करण्यास तिला फर्माविता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये राज्य शासनाच्या आदेशानुसार पुरविण्यात आलेली कोणतीही माहिती, ती ज्या व्यक्तीने पुरविलेली असेल त्या व्यक्तिविरूद्ध कोणत्याही अभियोगात वापरता येणार नाही.

(३) पोट-कलम (१) अन्वये केलेल्या आदेशाचे अनुपालन करून कोणतीही माहिती किंवा वस्तू पुरविण्यास किंवा हजर करण्यास कोणतीही व्यक्ती कसूर करील तर, तिला, दोषसिद्धीनंतर, तीन वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यंत कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

खोटे निवेदन. १५. कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांन्वये किंवा तदनुसार कोणतेही निवेदन करण्यास फर्माविण्यात येईल तेव्हा, जे कोणतेही निवेदन किंवा जी कोणतीही माहिती खोटी असल्याचे किंवा कोणत्याही महत्त्वाच्या तपशिलाच्या बाबतीत सत्य नसल्याचे तिला माहित असेल किंवा तसे मानण्यास वाजवी कारण असेल असे निवेदन करील किंवा अशी माहिती पुरविल तर, तिला दोषसिद्धीनंतर, तीन वर्षे मुदतीच्या मर्यादेपर्यंतच्या कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

## सात. पूरक व कार्यपद्धती विषयक

अधिनियमाच्या उपबंधाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न, इत्यादी. १६. जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमाच्या किंवा तदन्वये केलेल्या कोणत्याही आदेशाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघनास अपप्रेरणा देईल किंवा अपप्रेरणा देण्याचा प्रयत्न करील किंवा उल्लंघनाची पूर्वतयारी म्हणून कोणतेही कृत्य करील त्या व्यक्तीने यथास्थिती या उपबंधाचे किंवा त्या आदेशाचे उल्लंघन केले असल्याचे मानण्यात येईल.

झडतीसाठी विशेष उपबंध. १७. (१) कोणत्याही क्षेत्रातील जनतेस धोका असण्याची धास्ती वाटल्याचा परिणाम म्हणून राज्य शासन **शासकीय राजपत्रात** याबाबत ज्या क्षेत्रासंबंधी अधिसूचित करील अशा क्षेत्रात, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, कोणतीही व्यक्ती त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीचे उल्लंघन करून कोणताही स्फोटक किंवा ज्ञारक पदार्थ किंवा द्रव किंवा अपराध करण्यासाठी वापरण्यात येणारे हत्यार किंवा अपराध करण्यासाठी वापरता येईल अशी कोणतीही वस्तू नेत आहे किंवा काय याविषयी खात्री करून घेण्यासाठी अशा व्यक्तीला कोणत्याही रस्त्यावर, सडकेवर, बोळात, सार्वजनिक ठिकाणी किंवा मोकळ्या जागेत थांबविता येईल आणि तिची झडती घेता येईल आणि असा कोणताही पदार्थ किंवा द्रव, त्याच्या पात्रासह (कोणतेही असल्यास) किंवा अशा झडतीत सापडलेले असे कोणतेही हत्यार किंवा वस्तू जप्त करता येईल.

परंतु, अशी प्रत्येक झडती सभ्यतेकडे योग्य ते लक्ष देऊन घेण्यात येईल आणि कोणत्याही स्त्रीची झडती स्त्रीखेरीज इतराकडून घेण्यात येणार नाही.

(२) ज्या क्षेत्रासाठी पोलीस आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली असेल अशा कोणत्याही क्षेत्रात पोलीस उप-आयुक्ताच्या व इतरत्र पोलीस अधीक्षकाच्या सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही पोलीस प्राधिकाऱ्यास कोणत्याही जागेत, जलयानावर, वाहनात, वायुयानात प्रवेश करता येईल व त्याची किंवा प्राण्याची झडती घेता येईल, आणि त्या प्रयोजनार्थ, जे कोणतेही जलयान, वाहन, वायुयान किंवा प्राणी रोखून धरता येईल आणि कोणतीही विक्रेय वस्तू, जिन्नस किंवा गोष्ट (कोणतेही जलयान, वाहन, वायुयान किंवा प्राणी धरून) कलम ७ चे पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशांचे उल्लंघन करण्याकरिता किंवा कोणतेही घातपाती कृत्य करण्यासाठी वापरण्यात आली आहे, वापरण्यात येत आहे किंवा वापरली जाण्याच्या बेतात आहे असे त्यास सकारण वाटत असल्यास अशी विक्रेय वस्तू, जिन्नस किंवा गोष्ट जप्त करता येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये जप्त केलेली कोणतीही गोष्ट अभिहस्तांतरित करण्यात येईल आणि पोट-कलम (२) अन्वये जप्त केलेली कोणतीही विक्रेय वस्तू, जिन्नस किंवा गोष्ट या संबंधी (कोणतेही जलयान, वाहन, वायुयान किंवा जनावर यासह) विनाविलंब दंडाधिकाऱ्यास कळविण्यात येईल व त्यास, त्यांच्या तात्पुरत्या अभिरक्षेविषयी त्यास योग्य वाटेल असे आदेश देता येतील, तथापि ते असे की त्याच्या बाबतीत कोणताही अभियोग

त्यांच्या मते वाजवी असेल अशा मुदतीत दाखल करण्यात आला नसेल याबाबतीत यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर निधीच्या उपबंधाच्या अधीन दंडाधिकाऱ्यास त्यांच्या अंतिम विल्हेवाटी-विषयी त्यास इष्ट वाटतील असे आदेश देता येतील.

**अधिनियमाच्या उपबंधाच्या किंवा तदन्वये करण्यात आलेल्या आदेशांच्या उल्लंघनाची दखल घेणे.**

१८. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केले असेल त्याव्यतिरिक्त कोणतेही न्यायालय या अधिनियमाच्या उपबंधाच्या किंवा तदन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाच्या कोणत्याही अभिकथित उल्लंघनाची दखल, लोकसेवकाने अशा उल्लंघनाच्या तथ्यांविषयी केलेल्या लेखी प्रतिवृत्तावरून असेल त्याखेरीज, घेणार नाही;

(२) या अधिनियमाच्या उपबंधाचे जे उल्लंघन कोणत्याही व्यक्तीने केले असल्याचे अभिकथित असेल त्या उल्लंघनाच्या बाबतीतील कार्यवाही ती व्यक्ती त्यावेळी जेथे असेल, त्या ठिकाणी अधिकारिता असलेल्या समुचित न्यायालयासमोर करता येईल.

(३) फौजदारी व्यवहार संहिता, १८९८ यास जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये काहीही अन्तर्भूत केलेले असले तरी, कलम ११ च्या उपबंधाचे उल्लंघन सत्र न्यायालय, इलाखा शहर दंडाधिकारी किंवा प्रथम वर्गाचा दंडाधिकारी यांचेद्वारे न्यायचौकशीयोग्य असेल.

(४) फौजदारी व्यवहार संहिता, १८९८ हिच्या कलम २६०, पोट-कलम (१) यात विनिर्दिष्ट केलेल्या अपराधांची संक्षिप्त रीतीने न्यायचौकशी करण्यासाठी त्या त्या वेळी शक्ती प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास किंवा दंडाधिकारी मंडळास, याबाबत अभियोग करणाऱ्या पक्षाद्वारे करण्यात आलेल्या अर्जावरून, जर अशा दंडाधिकाऱ्यास किंवा दंडाधिकारी मंडळास योग्य वाटेल तर, राज्य शासन, उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ यात अंतर्भूत असलेल्या उपबंधांनुसार शासकीय राजपत्रामध्ये याबाबत प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये काढलेल्या आदेशांच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधांच्या उल्लंघनाची न्याय चौकशी करता येईल.

**शासनाच्या शक्ती आणि प्रत्यायोजन.**

१९. राज्य शासनास शासकीय राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, राज्य नियम करण्याच्या शक्ती व्यतिरिक्त, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये राज्य शासनास जी कोणतीही शक्ती किंवा कर्तव्य प्रदान करण्यात आले आहे किंवा त्यावर लादण्यात आले आहे अशी शक्ती [illegible] किंवा कर्तव्य, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा [illegible] त्याही असल्यास, राज्य शासनाच्या मते पोलीस उपआयुक्ताच्या किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा त्याच्या अधीन असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा प्राधिकाऱ्याकडून, वापरण्यात येईल किंवा पार पाडण्यात येईल.

**आदेशांच्या उल्लंघनाकरिता अभियोगातील गृहीत गोष्टी आणि तथ्ये प्रकट न करण्याचा किंवा दस्तऐवज दाखल न करण्याचा सरकारी अधिकाऱ्यांचा विशेषाधिकार.**

२०. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, या अधिनियमाखालील आदेशाची अधिप्रमाणित प्रत दाखल केल्यावर, त्या आदेशाच्या उल्लंघना-बद्दलच्या अपराधाच्या अभियोगात—

(१) तद्विरुद्ध सिद्ध होईपर्यंत ; आणि ते सिद्ध करण्याचा भार आरोपीवर राहील.—असे गृहीत धरण्यात येईल की,—

(अ) आदेश देण्यास या अधिनियमान्वये सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्याकडून तो देण्यात आला होता;

(ब) ज्या कारणामुळे किंवा ज्या प्रयोजनाकरिता आदेश देण्यात आला होता ती कारणे किंवा ते प्रयोजन अस्तित्वात होते आणि तो देणे आवश्यक होते अशी आदेश देणाऱ्या प्राधिकाऱ्याची खात्री झाली होती; आणि

(क) आदेश अन्यथा वैध आणि या अधिनियमाच्या उपबंधांना धरून होता; आणि

(२) कोणतीही गोष्ट किंवा कोणताही दस्तऐवज हा, आदेशात अंतर्भूत असलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींशी संबंधित असला तरी, अशी गोष्ट प्रकट केल्यामुळे किंवा असा दस्तऐवज दाखल

केल्यामुळे लोकहितास बाध येईल असे कोणत्याही सरकारी अधिकाऱ्यास वाटत असेल तर अशी गोष्ट प्रकट करण्याची किंवा असा दस्तऐवज दाखल करण्याची त्याच्यावर सक्ती करता येणार नाही.

**स्पष्टीकरण :**—ह्या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, आदेशाची अधिप्रमाणित प्रत म्हणजे भारताचा पुराव्याबाबत अधिनियम, १८७२ याचे कलम ७६ अन्वये विहित केलेल्या रीतीने प्रमाणित केलेली प्रत किंवा असा आदेश **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करणे या अधिनियमानुसार आवश्यक असेल तर, आदेशाच्या प्रसिद्धीशी संबंधित असलेल्या **शासकीय राजपत्राची** प्रत.

अधिनि- खाली लेले शे प्रसिद्ध णे व वणे.

२१. (१) या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अन्यथा उपबंधित केले असेल त्या व्यतिरिक्त या अधिनियमाद्वारे काढलेला प्रत्येक आदेश—

(अ) जर तो सामान्य स्वरूपाचा आदेश असेल किंवा व्यक्तींच्या एखाद्या वर्गावर परिणाम करणार असेल तर, तो काढणाऱ्या प्राधिकाऱ्यांच्या मते, त्या आदेशाद्वारे ज्यांच्यावर परिणाम होत असेल त्या व्यक्तींना कळविण्यासाठी जी रीत अत्यंत अनुकूल असेल त्या रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल;

(ब) जर तो एखादे महामंडळ किंवा भागीदारी संस्था यावर परिणाम करणारा असेल तर, दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ हिच्या पहिल्या अनुसूचीतील यथास्थिति नियमक्रम २९ पैकी नियम २ किंवा नियमक्रम ३० पैकी नियम ३ मध्ये समन्स बजाविण्यासाठी तरतूद केलेल्या रीतीने बजावण्यात येईल;

(क) जर तो, महामंडळ किंवा भागीदारी संस्था या व्यतिरिक्त एकएकटया व्यक्तीवर परिणाम करणारा असेल तर, त्या व्यक्तीवर—

(एक) आदेश जातीने तिच्या स्वाधीन करून किंवा तिला देऊ करून, किंवा

(दोन) डाकेने, किंवा

(तीन) ती व्यक्ती सापडत नसेल त्या बाबतीत आदेशाची एक अधिप्रमाणित प्रत तिच्या कुटुंबातील कोणत्याही प्रौढ पुरुष व्यक्तीजवळ देऊन किंवा

(चार) ती ज्या जागी शेवटी रहात होती किंवा व्यवसाय करीत होती किंवा लाभासाठी काम करीत होती असे माहित असेल त्या जागेच्या एकाद्या ठळक भागावर अशी प्रत चिकटवून बजावण्यात येईल.

(२) या अधिनियमानुसार काढलेल्या आदेशाविषयी एकाद्या व्यक्तीला यथोचितरीत्या कळविण्यात आले होते किंवा कसे असा प्रश्न उद्भवला असेल त्या बाबतीत, पोट-कलम (१) च्या उपबंधाचे अनुपालन हे, त्याला तसे कळविण्यात आले होते याचा निर्णायक पुरावा असेल परंतु उक्त उपबंधाचे अनुपालन करण्यात कसूर झाल्यामुळे त्याला तसे कळविण्यात आले होते हे इतर मार्गांनी सिद्ध करण्यास अडथळा होणार नाही किंवा त्या आदेशाच्या वैधतेस बाध येणार नाही.

ा- अटक केला ी

२२. कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेला अपराध जिने केला असल्याचा वाजवीरीत्या संशय असेल अशा कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही अधिपत्राशिवाय अटक करता येईल. या अधिनियमाखालील सर्व अपराध बेजमानती असतील.

२३. या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणत्याही व्यक्तीस प्रदान केलेल्या किंवा प्रदान केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही अधिकारितेचा किंवा शक्तीचा वापर करताना तिने सद्भावनापूर्वक आदेश दिलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही कृत्यासाठी किंवा त्याबद्दल किंवा त्याच्या संबंधात तिच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कोणतीही वैध कार्यवाही दाखल करता येणार नाही.

२४. (१) राज्य शासनास **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात

एकूण तीस दिवसांची मुदत होईल इतक्या, मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील तर, **शासकीय राजपत्रात** अशा निर्णयाची अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून, तो नियम यथास्थिती अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच परिणामक्षम राहील किंवा परिणामक्षम राहणार नाही; तथापि, अशा कोणत्याही फेरफारामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

२५. या अधिनियमाचे उपबंध त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियम, इतर अध्यादेश किंवा विनियम यांच्या शिवाय असतील आणि त्यामुळे त्यांचे अल्पीकरण होणार नाही. विधी लागू करण्यास प्रतिबंध नसणे.

## आठ. दंड संहितेची सुधारणा

२६. महाराष्ट्र राज्यास प्रयुक्त असताना, भारतीय दंड संहितेचे कलम १०३ यामध्ये पुढील मजकुराची शेवटी भर घालण्यात येईल. सन १८६० चा अधिनियम क्रमांक ४५ याच्या कलम १०३ ची सुधारणा.

" **पाचवा.**---शासनाच्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या, सांविधिक संस्थेच्या, शासनाच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखाली असलेल्या कंपनीच्या, रेल्वेच्या किंवा ट्राममार्गाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही मालमत्तेवर किंवा भाड्यासाठी किंवा मोबदल्यासाठी प्रवाशांची वाहतूक करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्यासाठी अनुकूल केलेल्या कोणत्याही वाहनावर आग लावून किंवा कोणताही स्फोटक पदार्थ टाकून केलेली अपकृति."

(यथार्थ अनुवाद)

के. मा. आराध्ये,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.